जा.क्र.वि.शा./निवडणूक/१०४५४/२०१७
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-०१,
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :- २१/१२/२०१७

<u>विषय</u> :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**<u>आदेश.</u>**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.२१/का-८ दि.१७/११/२०१७ च्या आदेशान्वये माहे जानेवारी-फेब्रुवारी-२०१८ या कालावधीत मुदती संपणा-या पुणे जिल्हयातील ९९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील भारती विदयापीठ पोलीस स्टेशन मधील भिलारेवाडी, गुजर निंबाळकर वाडी, जांभुळवाडी-कोळवाडी, मांगडेवाडी ता, हवेली जि. पुणे या तसेच पुणे ग्रामीण भागातील इतर ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. दिनांक २६/१२/२०१७ रोजी मतदान होणार आहे. व दिनांक २७/१२/२०१७ रोजी मतमोजणी **शासकिय अन्नधान्य गोदाम क्र. सी-६, शिवाजीनगर, पुणे.५** याठिकाणी होणार आहे.

सदर मतमोजणीची प्रक्रिया सुरळीतपणे व शांततेत पार पडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सार्वजनिक उपद्रव टाळण्यासाठी **शासकिय अन्नधान्य गोदाम क्र. सी-६, शिवाजीनगर, पुणे.५** येथील २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे आहे अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, **रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, **शासकिय अन्नधान्य गोदाम क्र. सी-६, शिवाजीनगर, पुणे.५** येथील २०० मीटर परिसरात दि. २७/१२/२०१७ चे ००.०१ वा. पासुन ते मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) मतमोजणीच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अधिकृत-अनाधिकृत हत्यारे तसेच परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवुन फिरणेस या आदेशान्वये मनाई करीत आहे.

सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय कर्मचा-याला (पोलीस दल,संरक्षण दल, तुरुंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना ) लागु राहणार नाही. तसेच ज्या परवानाधारकास रुढीप्रमाणे बंदूक प्रदर्शित करण्याचा अधिकार आहे. त्यांना हा आदेश लागु राहणार नाही.

२) मतमोजणीच्या परिसरात मोबाईल,कॉर्डलेस फोन,पेजर वापरण्यास अगर घेवुन येण्यास मनाई करण्यात येत आहे. (कर्तव्यावर असणा-या शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना हा आदेश लागु राहणार नाही)

३) मतमोजणीच्या परिसरात खाजगी इसमांना ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) मतमोजणीच्या परिसरात कोणताही मजकुर लिहीण्यास अगर छापील मजकूर प्रदर्शित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

५) मतमोजणीच्या परिसरात शासकीय वाहने सोडून कोणत्याही प्रकारचे वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

६) मतमोजणीच्या परिसरात पासशिवाय प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

७) मतमोजणीचा निकाल जाहिर झाल्यानंतर दि. २७/१२/२०१७ रोजी विजय मिरवणुका काढण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि. २१/१२/२०१७ रोजी दिला आहे.

**(रविंद्र कदम)**
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर.

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २१/१२/२०१७**